Extra copy.


# शासकीय तंत्रनिकेतन, जालना

नागेवाडी, औरंगाबाद रोड, जालना

दूरध्वनी -(ऑ.) 95-2482-282323 प्राचार्य-282929 , फॅक्स क्र-220105


जा.क्र. शातंजा/भांडार/नि.सा.लि.विक्री/2018-19/ 1823

दिनांकः- 24.08.2018

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जालना -431203

प्रती,
मा. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय
मुंबई -1

प्रती,
मा. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
औरंगाबाद.

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क संचालनालय,(जाहिरात विभाग)
प्रशासकीय इमारत,
मुंबई -400032.

विषय :- शासकीय तंत्रनिकेतन,जालना संस्थेतील निर्लेखित वस्तूंचे /सामुग्रीचे लिलाव विक्री करणे बाबत.
संदर्भ :- शासन परिपत्रक डीफपी/2016/प्र.क्र.07/16/विनिमय दि.22/06/2016

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की,महाराष्ट्र शासनाचे संदर्भीय परिपत्रकान्वये निर्लेखित वस्तूंचे /सामुग्रीचे लिलावाबाबतची निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बाबत सुचित केलेले आहे.त्यानुसार या संस्थेच्या अधिनस्त असलेल्या वस्तूंचे /सामुग्रीचे लिलावाची जाहिरात व अटी व शर्तीचे छायांकित प्रत जोडलेली असून,सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.हि विनंती.

आपला विश्वासू,

( प्रा.एस.आर.नवले )
प्र.प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,जालना

सोबतः- 1.जाहिरात.
2.जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती.

**प्रतः- संस्थेच्या नोटीस बोर्डवर.वेबसाईटवर.**

शासकीय तंत्रनिकेतन, जालना
नागेवाडी, औरंगाबाद रोड, जालना
दूरध्वनी -(ऑ.) 95-2482-282323 प्राचार्य-282929 , फॅक्स क्र-220105

जा.क्र. शातंजा/भांडार/नि.सा.लि.वि.जाहिरात/2018-19/ 1823
दिनांकः- 24.08.2018

# जाहीर लिलाव विक्री

संस्थेतील जुनी पुराणी,निरुपयोगी यंत्रसामुग्री,यंत्रअभियांत्रिकी,विदयुत,कर्मशाळा,कार्यालय विभागातील,संगणक,प्रिंटर,झेरॉक्स मशीन ई.व लोखंडी व लाकडी तुटलेले निरुपयोगी फर्निचर,लोंखंडी भंगार ई.वस्तूंचा विदयार्थ्यांनी तयार केलेले लोखंडी,लाकडी जॉब इ.वस्तूंचा लिलाव विक्री **"आहे त्या स्थितीत"** लिफाफा पध्दतीने करावयाचा आहे.त्यासाठी नोंदणीकृत खरेदीदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.लिलाव करावयाच्या वस्तु संस्थेत दि.29/08/2018 ते दि.31/08/2018 या दरम्यान सकाळी 11.00 ते संध्याकाळी 04.00 वाजेपर्यंत पहावयास मिळतील.त्याच दरम्यान निविदा अर्ज रु.500 ( ना परतावा) किमतीत विकत घेता येईल.

पूर्ण भरलेले निविदा अर्ज 25,000 रुपये अनामत रक्कमेसह राष्ट्रीयकृत बॅकेच्या डी.डी. स्वरुपात 'प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन,जालना'या नावे काढून दि.29/08/2018 ते दि. 31/08/2018 या दरम्यान सकाळी 11.00 ते संध्याकाळी 04.00 वाजेपर्यंत सीलबंद पाकीटात कार्यालयात जमा करावे.सर्व सीलबंद निविदा दि.01/09/2018 रोजी दुपारी 2.30 वाजता प्राचार्य कक्षात उघडण्यात येतील.

प्र.प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,जालना

# शासकीय तंत्रनिकेतन, जालना

नागेवाडी, औरंगाबाद रोड, जालना

दूरध्वनी -(ऑ.) 95-2482-282323 प्राचार्य-282929 , फॅक्स क्र-220105


## नियम, अटी व अर्जाचा नमुना

शासकीय तंत्रनिकेतन,जालना येथे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र.013/प्र.क.30/2013/विनिमय भाग 2/ दिनांक 07/04/2015 व डीफपी/2016/प्र.क्र.07/16/विनिमय दि.22/06/2016 अन्वये वस्तुंचे लिलाव विक्री होत आहेत.

### जहिरातीच्या अनुषंगाने लिलावाच्या अटी

**वस्तुंचे ठिकाण** :- सर्व साहित्य कर्मशाळा विभागात ठेवण्यात आलेले आहेत.

**अटी** :-

1) निविदा भरतांना प्रत्येक लॉटसाठी प्रपत्र-अ मध्ये वेगळे दर दयावेत.ज्यांचे दर ज्या लॉटसाठी जास्तीत जास्त असतील ति निविदा स्विकारण्यात येईल.
2) निविदा फॉर्म नापरतावा रु.500/- प्रमाणे,संस्थेच्या कार्यालयातुन रक्कम अदा करुन प्राप्त करावे व तो निविदा फॉर्म भरुन दिलेल्या पाकीटात सिलबंद करुन नमुद कालावधीत कार्यालयात जमा करावा. व टोकन नंबर घ्यावा.
3) निविदा भरतांना दोन लिफाफे पध्दतीने भरावयाची आहे. लिफाफा एक मध्ये अनामत रक्कमेचा डी.डी. व व्यवसाय नोंदणी,आधार कार्ड ,पॅन कार्ड ,मतदान कार्ड व आय कार्ड असल्यास इ. झेरॉक्स प्रत जोडावी.व पाकीट दोन मध्ये निविदा ऑफर दर देण्यात यावेत.
4) अनामत रक्कम करीता फक्त राष्ट्रीयकृत बॅकेचा 25,000/- रुपयाचा डी.डी.देण्यात यावा.इतर कोणत्याही प्रकारचा भरणा स्विकारला जाणार नाही.
5) ज्यांची निविदा मंजूर झाली त्यांनी,दुस-या कामाच्या दिवशी लगेचच कार्यालयात रक्कम भरावी.
6) ज्यांची निविदा स्विकारण्यात आली नाही त्यांनी दि. 01/09/2018 रोजी 5.30 वाजेपर्यंत डी.डी. परत घ्यावा.व मंजूर झालेल्या निविदा धारकास पुर्ण व्यवहार झाल्यास( रक्कम भरुन साहीत्य नेल्यानंतर डी.डी. परत दिला जाईल.)
7) साहीत्याची रक्कम त्वरीत दुस-या कामाच्या दिवशी न भरल्यास अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल.
8) निविदा मंजूर झाल्यास रक्कम भरुन पावती भांडार विभागात दाखवून सामान नेताना गेट पास घ्यावा.व गेटपासवर संबंधीत विभागाची सही घ्यावी. स्वखर्चाने सर्व सामान लवकारात लवकर घेवून जावे.
9) पुर्ण भरलेली गेट पास गेट वर जमा करुन त्याच दिवशी सामान घेवून जावे.
10) फक्त रजिष्ट्रेशन केलेल्या व्यक्तिनी सोबत टोकन//पावती आणल्यावरच त्यांना डी.डी. परत मिळेल.
11) बंद लिफाफयावर ' निर्लेखित वस्तूसाठी निविदा ' असे लिहून खाली टोकन नंबर लिहावे.
12) लिलवास योग्य प्रतिसाद न मिळाल्यास लिलाव रद्द किंवा अटीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा.प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,जालना यांना राहतील.
13) सोबत दिलेल्या प्रपत्र - अ मध्ये वस्तूंची निर्लेखित शासकीय किंमत दिली आहे.ते पाहूनच निविदा भरावी.
14) सिलबंद पाकीटात निविदा ( प्रपत्र - अ ) भरुन पाकीट क्र.दोन मध्ये व डी.डी. इतर कागदपत्रे पाकीट क्र.एक मध्ये सिलबंद करुन मोठया पाकीटात बंद करुन त्यावर संस्थेच्या प्रबंधकाची सही घेवून आवक/जावक विभागामध्ये पाकीट जमा करावे.
15) माल उचलतांना त्यावर शासकीय कर जी.एस.टी.वगैरे लागत असेल तर ते निविदाधारकास भरावा लागेल.
16) निविदा मंजूर झाल्यावर सर्व माल त्वरीत उचलण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
17) निविदा उघडतांना पाकीट क्र.एक प्रथम उघडले जाईल.कागदपत्राची छाननी करुन,योग्य रक्कमेचा डी.डी. अनामत रक्कम इ.खात्री करुन स्विकारण्या योग्य निविदा असल्यास समितीपुढे पाकीट क्र. दोन उघडण्यात येईल. कागदपत्रे व अनामत रक्कम अपुरे किंवा स्विकारण्यास योग्य नसल्यास पाकीट क्र.दोन उघडले जाणार नाही.व अशा निविदेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
18) वरील बाबत समितीचा निर्णय अंतिम राहील.
19) आपत कालीन परिस्थितीत निविदा रद्द करणेचा कुठ्लेही कारण न देता व योग्य किंमत नसल्यास निविदा स्विकारणे/नाकारणे इ.चा अधिकार प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,जालना यांना असेल.

| | | |
|---|---|---|
| निविदा भरण्याचा कालावधी | दि. 29/08/2018 ते दि. 31/08/2018 | सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वा. |
| निविदा उघडण्याची वेळ | दि. 01/08/2018 | दुपारी 02.30 वाजता |